क्र.का.५/मुद्रांक-१९/प्र.क्र.१८/१३/ २०८/२०१४
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे.
दिनांक - ५/०६ /२०१४

प्रति,

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
२) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक औरंगाबाद, अमरावती, लातूर
३) सर्व सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी, नों.म.नि.का,,पुणे.

विषय -अभय योजना २००८ अंतर्गत मुद्रांक शुल्क विषयी सादर केलेल्या अर्जावर निर्णय होण्याबाबत.
संदर्भ - शासनाचे दि.२ जून २०१४ रोजीचे आदेश.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविणेत येते की, शासनाने सन २००८ यावर्षी अभय योजना लागू केली होती व त्या योजनेस शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दि.३० जून २००९ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती.

परंतु अभय योजनेमध्ये संपूर्ण राज्यातील विभाग निहाय ६६७० प्रकरणे निकाली काढणेवर शिल्लक राहीलेली आहेत. त्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी शासनाने सोबत जोडलेल्या आदेशान्वये दि.२ जून २०१४ पासून ते दि.३१/८/२०१४ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सोबत शासन आदेशाची प्रत शिघ्रसंदर्भासाठी व तातडीने अंमलबजावणी सुरु करण्यासाठी पाठविण्यात येत आहे.

तरी आपले अखत्यारीतील सर्व कार्यालयांना उक्त शासन आदेशाची प्रत पाठवून याबाबतची पोच घेण्यात यावी.

का.प्र.मा.नो.म.नि.यांचे सहीची असे.

सह नोंदणी महानिरीक्षक तथा
मुद्रांक अधिक्षक,(मुख्या.) म.रा.पुणे

**ORDER**

**Revenue and Forests Department**
**Madam Cama Road,**
**Hutatma Rajguru Chowk,**
**Mantralaya, Mumbai-32.**
**Dated:- 2nd June, 2014.**

| |
|---|
| The Maharashtra Stamp Act (LX of 1958) |

No.MUDRANK-2012/1121/C.R.316/M-1:- Whereas, by Government order, Revenue and Forests Department, No.MUDRANK-2012/1121/C.R.316/M-1, dated 7th June, 2008 (hereinafter referred to as "the said order"), issued under clause (a) of section 9 of the Bombay Stamp Act (LX of 1958), the Government of Maharashtra has reduced, for a period commencing from the 9th June and ending on the 31st October, 2008 (both days inclusive) the penalty chargeable under section 31 (4) (ii), 32 A(2), 32 A(4) and 39 (1)(b) on the instrument mentioned in the said Order, to rupees five hundred or, as the case may be, rupees thousand on the terms and conditions specified therein;

And whereas, the State Government has, by orders, from time to time, extended the period of the scheme under the said Order upto 30th June, 2009:

And whereas, it has brought to the notice of the State Government that 6,670 applications under this scheme of the said Order are still pending for disposal;

And whereas, the State Government considers it expedient to extend the period for disposal of the above said 6,670 applications;

Now, therefore, in exercise of powers conferred by clause (a) of section 9 of the the Maharashtra Stamp Act (LX of 1958), and in partial modification of all the Orders issued in this behalf, the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby specifies.-

(a) that the period commencing from 2nd June, 2014 and ending on 31st August, 2014 (inclusive of both days), to be the period for disposal of the above mentioned 6,670 pending cases under the scheme of the said Order; and

(b) that no new applications shall be received in this period under the scheme of the said order; and

(c) after the payment of stamp duty on above mentioned documents, it cannot be registered as per the provision under section 23 of Registration Act 1908.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

(Rajesh Narvekar)
**Deputy Secretary to Government**

महसूल व वन विभाग
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २ जून २०१४.

## आदेश

(१९५८ चा अधिनियम क्र. ६०)

क्रमांक:-मुद्रांक-२०१२/११२१/प्र.क्र.३१६/म-१- ज्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, (१९५८ चा ६०) च्या कलम ९ च्या खंड (अ) च्या तरतूदीनुसार निर्गमित करण्यात आलेल्या शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक-२००७/९२२/प्र.क्र.१९९/म-१, दिनांक ७ जून, २००८ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त आदेश" करण्यात आला आहे) याद्वारे महाराष्ट्र शासनाने दिनांक ९ जून, २००८ पासून सुरु होणा-या व दिनांक ३१ ऑक्टोबर, २००८ (दोन्ही दिवस धरुन), कलम ३१ (४) (दोन), ३२ अ (२) , ३२ अ (४) व ३९ (१)(ब) मध्ये अन्वये आकारणी योग्य असलेली जास्ती, उक्त आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, अटी व शर्तीवर रु.पाचशे किंवा रु.एक हजार इतकी कमी केली होती.

ज्याअर्थी, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार सदर योजनेच्या उक्त आदेशांना दिनांक ३० जून, २००९ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आली आहे.

ज्याअर्थी, आता शासनाच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, सदर योजने अंतर्गत दाखल केलेली अद्याप ६६७० प्रकरणे निपटारा करण्यासाठी प्रलंबित आहेत.

आणि, ज्याअर्थी उक्त नमूद ६६७० प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी सदर योजनेचा कालावधी वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, (१९५८ चा ६०) च्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन आणि उक्त आदेशामध्ये अंशत: सुधारणा करुन सार्वजनिक हितासाठी तसे करणे आवश्यक असल्याबाबत खात्री पटली असल्यामुळे महाराष्ट्र शासन याद्वारे पुढीलप्रमाणे नमूद करीत आहे;

अ) उपरोक्त ६६७० शिल्लक प्रकरणांच्या निपटा-यासाठी दिनांक २ जून, २०१४ पासून सुरु होणा-या व दिनांक ३१ ऑगस्ट, २०१४ रोजी (दोन्ही दिवस धरुन) संपणारा कालावधी हा योजनेकरिताचा कालावधी म्हणून निश्चित करीत आहे, आणि

ब) या कालावधीत या योजनेखाली कोणतेही नवीन प्रकरण स्विकारता येणार नाही, आणि

क) उक्त प्रकरणांच्या दस्तामध्ये मुद्रांक शुल्काचा भरणा केल्यानंतर नोंदणी अधिनियम, १९०८ मधील कलम २३ मधील तरतूदीनुसार सदर दस्तांची नोंदणी करता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

( राजेश नार्वेकर )
उपसचिव